NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# "स्त्रीवाद आणि सांस्कृतिक प्रतिके"

**डॉ. सौ. श्रध्दा विनोद कोठावळे,** सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र, विभाग प्रमुख, सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरूंदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, मो. नं. 9822767014.

---

**सारांश -**

जगभर प्रदिर्घकाळ जी पितृसत्ताक समाजव्यवस्था आहे. त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेदाला सांस्कृतिक लिंगभेदाचे स्वरुप दिले. आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्री पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्तासंबंध रचला. या सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये या सत्तेने निश्चित केली व स्त्रियांवर लादली या गोष्टींची जाणीव म्हणजेच स्त्रीवादी जाणीव होय. "स्त्री" ही स्त्री म्हणून जन्मत नाही तर ती घडविली जाते हे 'सिमॉन दि बुआ' यांचे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणीवेचे प्रेमच आहे. सांस्कृतिक प्रतिकातून दडपलेले स्त्रीत्व हे अनेक विध गोष्टीतून दिसून येते. म्हणूनच स्त्रीवादी जाणीवेचा प्रवाह ही असाच विविध पातळयावरील विषमतेविरुध्दच्या संघर्षातून विकसीत होताना दिसतो आहे. स्त्रीवादी समीक्षा स्त्रियांच्या साहित्यातून जीवशास्त्रीय, भाषिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक अशा वेगवेगळ्या दृष्टीकोनातून वेध घेवून त्यातले वेगळेपण अधोरेखीत करते.

**"स्त्रीवाद आणि सांस्कृतिक प्रतिके"**

**प्रस्तावना -**

स्त्रियांना दिले जाणारे दुय्यम स्थान, त्यासाठी समाजामध्ये कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद हा एक केवळ सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाचा एक भाग नसून तो एका बाजूने स्त्रियांच्या दर्जाविषयी स्पष्टीकरण करणारा अभ्यास होय. दुसऱ्या बाजूने स्त्रियांची असमानता दूर करणारे उपाय आणि त्यांच्या सबलीकरणाची पध्दती सांगणारा एक समतोल असा सामाजिक शास्त्राचा अभ्यास होय. असे यशोधोष्णमूत्र सुंदरम यांनी In search of theory of women's studies" या ग्रंथात स्पष्ट केले आहे. तर विद्युत भागवत यांच्या मते. स्त्रीवाद ही संकल्पना स्त्रियांच्या समस्यासंबंधीची सर्व समावेशक अशी मांडणी आहे. (साखरे सीमी, स्त्रीवाद सीमा प्रकाशन नागपूर)

जगभर प्रदिर्घकाळ जी पितृसत्ताक समाजव्यवस्था अस्तित्वात आहे. त्या व्यवस्थेने जैविक लिंगभेदाला सांस्कृतिक लिंगभेदाचे स्वरुप दिले. आपले हितसंबंध जपण्यासाठी स्त्री पुरुष यांच्यात एक विशिष्ट सत्तासंबंध रचला. या सत्तासंबंधात स्त्रीला गौण व दुय्यम ठरविले गेले. स्त्रीचा स्वभाव, लक्षणे कार्यक्षेत्र, कर्तव्ये या सत्तेने निश्चित केली व स्त्रियांवर लादली या गोष्टीची जाणीव म्हणजेच स्त्रीवादी जाणीव होय. स्त्री ही स्त्री म्हणून जन्मत नाही, तर ती घडविली जाते. (Women is not born a women, Rather one become a women) हे फ्रेंच स्त्री वादी लेखिका "सिमॉन दि बुवा" यांचे विधान म्हणजे स्त्रीवादी जाणीवेचे महत्वाचे प्रमेय आहे.

इतिहासाचे सुक्ष्म अवलोकन केल्यानंतर लक्षात येते की, प्राचीन काळापासून स्वत:चे अस्तित्व वा सामाजिक दर्जा सिध्द करण्यासाठी स्त्रियांना विविध संघर्षाना सामोरे जावे लागले, अगदी पुरातन कालखंडापासून सर्व समाजव्यवस्था आणि संस्कृतीनी स्त्रियांना दुय्यम स्थान दिल्याचे दिसून येते. मात्र काळाच्या प्रवाहाबरोबर कला, विद्या साहित्य, ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक आर्थिक व राजकीय क्षेत्रातील आमूलाग्र परिवर्तनानंतर स्त्रियांनी स्वत:च्या हक्कासाठी, अधिकारासाठी तसेच स्वत:ला समाजामध्ये समानतेचे सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. स्त्रियांच्या समान राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कासंदर्भात लढणारे व ते हक्क कायम ठेवण्यासाठी वेगवेगळ्या विचारसरणीने एकत्रितपणे केलेल्या आंदोलनाला "स्त्री वाद" असे म्हणता येईल.

(ज्योती रामोड – Education and society since 1977 year 46, Issue No 2 Jan March 2023)

स्त्रीवादी इतिहास लेखनाला खऱ्या अर्थाने सुरुवात पाश्चात देशात मूलत: अमेरिकेत झाली आणि नंतर हळूहळू ती जगभर विस्तारित गेली, लिंगभेद, सामाजिक दर्जा, शैक्षणिक स्थिती, पुरुष प्रधान, संस्कृती, सामाजिक दुय्यमत्व आणि निसर्गत: स्त्रियांना कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या विविध कारणांमुळे स्त्रियांना साहित्य लेखनात विशेष स्थान मिळू शकले नाही. स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा नष्ट करण्यासाठी अवलंबविण्याचे विविध मार्ग आव्हाने व चळवळी यांची मांडणी व अभ्यास स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या माध्यमातून केला आहे. स्त्रियांसंबंधीचे शतकानुशतके दडपले गेलेले प्रश्न समोर घेवून प्रामुख्याने धर्माचा प्रभाव, स्त्रियांच्या कामाला नसलेले उद्पादक मूल्य शैक्षणिक क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व, स्त्रियांची सर्व निर्णय प्रक्रियेतील अनुपस्थिती, कार्यकर्तृत्वाची भिन्न भिन्न क्षेत्रे आणि मुख्यत: पुरुषप्रधान इतिहास प्रवाह इ. मुळे स्त्रिया इतिहासलेखनामधून अदृश्य राहिल्या. मात्र बदलत्या परिस्थितीनुसार, स्त्रियांना आत्मभान आल्याने काळानुरुप स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन

महत्वपूर्ण बदला अधिष्ठीत असल्याचे दिसून येते. स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव असल्याचे दिसत आहे.

भारतीय इतिहासात विषमतामूलक समाज रचनेला विरोध करणारी समताधिष्ठित विचारधारा कायम अस्तित्वात होती. याच प्रवाहात 19 व्या शतकात स्त्री शुद्रानिशुद्राच्या दास्यत्वामागील कारणांची मिमांसा करताना जोतीराम फुले यांनी धर्मजातपितृसत्तेचे सांस्कृतिक राजकारण उघड केले. आणि भारताला प्रबोधनकाळात आणले. त्यांच्या सोबतीने आणि कधी स्वतंत्रपणे सावित्रीबाई फुले यांनी विशेषत: उच्चवर्णीय स्त्रियांची कुलीनता निर्धारित करणाऱ्या कठोर नियमांना छेदण्याचे बळ स्त्रियांमध्ये आणले. त्यांच्या अर्थपर्ण अस्तित्वाचे त्यांना भान दिले. (डॉ. अश्विनी तोरळे - स्त्री वाद, बहुआयामी चर्चा विश्व)

स्त्री मुक्ती चळवळीनी पुढे आणलेल्या प्रश्नांची धार कमी करण्यात आणि त्यातल्या निवडक मुद्यांचा धंद्यासाठी वापर करण्यात प्रसिध्दी माध्यमांना आणि जाहिरातदारांना यश यायला लागले आहे. स्त्रीला नवे हक्क नकोत तर हवी आहे नवी जीवनशैली, तिला स्वयंनिर्णय नको, तर हवा आहे स्वसुखाचा शोध, असा समज स्त्री पुरुषाच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न माध्यमे करीत आहेत. एकीकडे स्त्री मुक्त आहे, महत्वाकांक्षी आहे, तिच्यात आत्मविश्वास आहे असे म्हणत तिला सुपरवुमनची प्रतिमा बहाल केली आहे. स्त्रियांसाठी असणाऱ्या पुरवण्यांमधून स्त्रीला कुटूंब परंपरा, पती, मुल, नातेवाईक, सणवार, व्रतवैकल्य, सेवा त्याग, स्वयंपाकघर ......... अस घरात कोंडले जातय, स्त्रीच्या अशा प्रतिमा बाजाराधिष्ठित अर्थकारणाला पोषक आहेत. (गीताली वि.म. स्त्री वाद – सुपर वुमन,प्रतिमेमागील सत्तासंबंधांचे सांस्कृतिक राजकारण)

मानवाचा एकूण इतिहास पाहिला तर असे दिसते की, हा संघर्षाचा इतिहास आहे. हा संघर्ष पुढे मुलभूत गरजा मिळविण्यासाठी झाला. आणि पुढे पुढे तो मानवाच्या अस्मितेपर्यंत पोहचला. जगभर हे संघर्ष वेगवेगळ्या नावावर झाले. त्यातून एक प्रकारची मानवाची उतरंड तयार झाली आणि या उतरंडीच्या टप्प्यांना धर्म, जात, वर्ग, प्रदेश आणि लिंग अशी नांवे देण्यात आली. यात लिंग विषमता ही पृथ्वीच्या पाठीवर सर्व प्रदेशात समूहामध्ये अस्तित्वात होती, किंबहूना आजही आहे. असे आपल्याला दिसेल.

भारत हा 20 व्या शतकात स्वतंत्र झालेला देश आहे. त्या आधी या देशात अनेक प्रकारच्या विषमता होत्या. भारतात शिक्षणाचा झालेला प्रसार विशेषत: स्त्री शिक्षणाच्या प्रसाराने 'गुलामगिरी' ही मानसिकता आहे हे अधोरेखीत केले. ही व्यवस्था मानवनिर्मिते असल्यामुळे ती संपवता येते. या विषयी चळवळ उभी राहिल्यामुळे स्त्रिया मुक्त व्हायला सुरुवात झाली. स्त्रियांनी शेतीचा शोध लावला आणि मानव शिकारी बरोबरच स्वत:च्या अन्नाची निर्मिती शेतीमार्फत करु लागला. पुढे भूभागावरील मालकी हक्क ही संकल्पना आली आणि बाईच्या गर्भावरही मालकी हक्क सांगण्याची प्रथा सुरु झाली. आणि संततीवर मालकी कोणाची यावरुन स्त्रियांना नियंत्रणात ठेवण्याची प्रथा सुरु झाली. जमिनीची मालकी माझ्याच ताब्यात रहाण्यासाठी 'वारसा' ही संकल्पना रुजली आणि त्यातून लग्न नावाची सामाजिक संस्था, व्यवस्था हळूहळू प्रस्थापित करण्यात आली. आणि याच व्यवस्थेने जात अधिक घट्ट केली आणि स्त्रियांवरती अनेक बंधने नियम लागू करण्यात आले.

**प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्त्रियांवर संस्कृतीतून लादलेल्या प्रतिकांचा आपण विचार करणार आहोत. ते खालीलप्रमाणे–**

**सर्जनशीलता -**

हे स्त्री म्हणून असलेले शारिरीक वास्तव, वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया समाजात वेगवेगळया काळात तिच्यात विरोधी वापरले गेल्या आणि वापरले जातय. मूल नसलेल्या स्त्रीला ही वांझोटी म्हणून हिणवले जातय तर मुलगा नाही म्हणूनही तिच्या वेगळ्या नजरेने पाहिले जातेय. पण सर्व समाजातल्या स्त्रियांच्या गर्भाशयावर मात्र समाजाची अनेक बंधने असतात. स्त्रियांनी लग्न केले पाहिजे, विशिष्ट वयातच लग्न केले पाहिजे. स्वजातीतच पाहिजे. कुटूंबातील व्यक्ती म्हणतील त्या पुरुषांशीच कुटूंबाच्या पध्दतीप्रमाणेच, असे अनेक नियम तयार झालेले दिसतात. आणि हे नियम पाळले नाहीत तर स्त्रियांना अत्याचाराला हिंसाचाराला बळी जावे लागते. त्यात एखाद्या स्त्रीला मासिक पाळी येत नसेल, गर्भाशय नसेल तर मग तिला माणूस म्हणून मोजलेच जात नाही. याचा अर्थ जे तिच्या हातात नाही त्या गोष्टीची किंमत समाजातल्या स्त्री पुरुष विषमतेमुळे मोजावी लागते.

**शुध्दता किंवा पवित्रता -**

याचा सर्वात मोठा त्रास स्त्रियांना पिठ्यानपिठ्या भोगावा लागला आहे. स्त्रियांचे शारिरीक संबंध कोणाबरोबर आहेत यावरुन तिचे पावित्र्य ठरविण्याची पध्दत सर्वच समाजात अगदी पुढारलेल्या देशांमध्येही असलेली दिसते. उदा.

जेवणानंतर पुरुष शतपावलीसाठी बाहेर जातो. उशीरपर्यंत बसतो, पण स्त्रियांना तू एवढ्या रात्री बाहेर काय करीत होतीय हा प्रश्न विचारला जातो. दक्षिण आफ्रिकेसारख्या देशात तर यापुढे भयानक प्रथा आहेत. मुस्लीम बहुल देशात तर स्त्रियांवर आजही बंधने आहे. कौमार्य चाचणी प्रथा आजही काही जातीमध्ये आहे. बोहरा समाजात तर खूपच अघोरी प्रथा आहे. उच्चवर्णीय ब्राम्हण समाज आजही मुंजीचा कार्यक्रम करतो. आणि या कार्यक्रमासाठी नटून भटून सुट्या काढून स्त्रिया जात असतात. स्त्रिया कमावत्या झाल्या आहेत. शिकल्या आहेत. सर्व क्षेत्रात आपले कौशल्य बुध्दीमत्ता सिध्द केली आहे. असे असतानाही अशा प्रकारचे विधी केले जाते हे लिंगभेद जन्य विषमतेचे मूर्तरुप आहे.

**सामाजिक दर्जा -**

आपल्या समाजात स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा त्यांच्या कर्तृत्वाऐवजी त्यांच लग्न झालेले आहे. किंवा नाही त्यांचा नवरा ह्यात आहे की नाही, तो त्यांच्यासोबत रहातो की नाही यावरुन ठरतो. विधवेला साजशृंगार करण्याची, मनाप्रमाणे जगण्याची अगदी तिच्या मुलाच्या लग्नातही कोणताही विधी करण्याचा अधिकार समाज देत नाही. हिच स्थिती नवरा सांभाळ करीत नसलेल्या किंवा त्याच्या जाचाला कंटाळून स्वतंत्र किंवा माहेरच्या आधाराने रहाणाऱ्या स्त्रीची असते. लिंग विषमतेमुळे स्त्रिया जीवघेण्या अशा कौटूंबिक हिंसाचाराला सामोरे जातात. पण त्या या नात्यातून बाहेर पडत नाहीत. अशा त्रासाला सामोरे जात असणाऱ्या स्त्रियांचाच समाज गौरव करतो. आपल्या कडच्या म्हणीही त्याच अर्थाच्या आहेत. उदा. 'मरणी मेली पण बापाच्या घरी परत नाही आली, मुलीने उभ जाव आणि आडवच परत याव. दिल्या घरी सुखी रहा. या सारख्या अनेक म्हणी स्त्रियांना गुलामगिरीत अडकविण्यासाठी, त्यातून बाहेर पडू न देण्यासाठी हळूहळू त्यांच्या मानसिकता घडवीत असतात.

**शारिरीक क्षमता -**

मुलांची शरीररचना धष्टपुष्ट असते, मुली जन्मत:च अशक्त असतात असे लहानपणापासून दोघांच्याही मनावर बिंबवले जाते. मुलींना घरातच बैठे खेळ खेळायला लावल्यामुळे त्यांच्या शरीराची हालचालच होत नाही. मुलांच्या बाबतीत शारिरीक हालचाली खेळ यामुळे त्यांची भूक विस्तारते. मुले सतत बाहेर असल्याने परिसराची ओळख होऊन, सामान्य ज्ञान व्यावहारिक शहाणपण वाढते. सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे याचे शिक्षण मिळते. आमची मुलगी घराच्या बाहेर नाही. असे अभिमानाने सांगणारे पालकही आपणास भेटतात. स्त्री पुरुषांची वेशभूषा अलंकार हा तर गुलामी मानसिकतेचा स्वतंत्र विषयच होतो. लहानपणापासून ते मरे पर्यंत स्त्रियांचे सर्व कपडे अलंकार हे त्यांना बांधून ठेवणारे त्यांच्या हालचालीवर मर्यादा आणणारे त्यांना दुसऱ्याच्या ताब्यात ठेवणारे आहेत. उलट पुरुषांचा पोशाख हा सुटसुटीत आहे. मारहाणीच्या किंवा संकटाच्या काळात स्त्रिया त्यांच्या कपड्याने अधिक उघड्या पडतात अधिक हताश होतात.

सौंदर्याच्या नावाखाली स्त्रियांच्या अंगावर टोचलेले अलंकार तिचे सौदर्य तर खुलवत नाहीतर, उलटपक्षी स्त्रीच्या हालचालीचा अंदाज घेण्यास मदत करतात. स्त्रियांचे पारंपारिक कपडे, अनुत्पादक वेळ वाया घालवणाऱ्या त्यांचे लक्ष विकेंद्रीत करणाऱ्या गोष्टी आहेत.

**मालकी हक्क -**

देशाचे नागरिकत्व असलेल्या स्त्रियांना त्यांच्या स्त्रीत्वामुळे कोणताही मालकी हक्क मिळत असताना दिसत नाही. तिच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत परक्याचे धन, आणि सासरी तू दुसऱ्याच्या घरुन आली आहेत असे म्हणत तिचा स्वीकारच केला जात नाही असे प्रसिध्द लेखिका डॉ. तारा भवाळकर त्यांच्या 'तिसऱ्या बिंदूच्या शोधात' या पुस्तकात म्हणतात. कायद्याने वडिलांच्या संपत्तीत बरोबरीची हिस्सेदार आहे. आणि तिचं नवऱ्याच्या संपत्तीतही अर्धांगिनी म्हणून हिस्सेदार आहे. पण प्रत्यक्षात मात्र रोजच्या जगण्यासाठी लागणाऱ्या किमान खर्चासाठी ती नवऱ्यापुढे लाचार झालेली दिसते, मुली लग्नाच्या संबंधात नवऱ्या मुलापेक्षा वयाने, शरीरयष्टीने, शिक्षणाने, उंचीने आर्थिकदृष्टीने अनुभवाने कमकुवत राहतात. लग्नानंतर पुरुषाचे गुण वाढतच जातात. पण स्त्रियांचे गुण मात्र वाढण्याची संधी समाज तिला कमी प्रमाणात देतो. त्यामुळे तिचे दौबर्ल्य दिवसेंदिवस वाढतच जाते.

**आर्थिक स्थिती आणि आवश्यक संधी -**

स्त्रियांच्या नावावर संपत्ती नसल्याने भांडवलासाठी तारण ठेवण्यासाठी त्यांच्याकडे काहीही नसते. त्यामुळे व्यवस्थेत दुय्यम स्थानावर असलेल्या स्त्रिया अधिकच शोषित होतात आणि नवरा/ कुटूंब/समाज/सरकार अशा सर्वच नियंत्रण करणाऱ्या यंत्रणाच्या पुर्णपणे ताब्यात जातात. स्त्रिया या माणूस म्हणून या देशाची संपत्ती साधने आहेत. त्यांचा विकास झाला तरच देशाचा एकूण विकास होईल. हा मानवी विकासाचा सिध्दांत आपल्याकडे नाही. त्यामुळे स्त्रियांचे जसे

नुकसान होते तसेच समाजाचे आणि देशाचेही नुकसान होते. यासाठी आर्थिक मुलभूत रचनांची तरतुद करणे आवश्यक असते.

समाजात सध्या दिसत असलेली लिंगविषमता ही मानव निमित्त आहे. ती अनेक वर्षे रुजल्यामुळे तिचे उच्चाटन करायला वेळ लागेल. या लिंग विषमतेमुळे पुरुषालाही माणूस म्हणून जगण्याची संधी नाकारली जाते. याची जाणीव समाजाच्या लक्षात आणून दिली तर आपोआपच समाजातल्या सर्व घटकांचा समानतेच्या चळवळीत सहभाग वाढेल. आणि समाजात समानता येण्याची शक्यता दृष्टीपथात येईल. (सांस्कृतिक प्रतिकांनी दडवलेले स्त्रीत्व, स्त्रीवाद- बहुआयामी चर्चाविश्व)

**समारोप -**

अशाप्रकारे अनेकविध गोष्टीतून सांस्कृतिक प्रतिकांनी दडपलेले स्त्रीत्व आपणास दिसून येते. स्त्रीवादी जाणीवेचा प्रवाह ही असाच विविध पातळ्यावरील विषमतेविरुध्दच्या संघर्षातून विकसीत होताना दिसतो आहे. स्त्री वादी समीक्षा स्त्रियांच्या साहित्यातून जीवशास्त्रीय भाषिक, मानसशास्त्रीय सांस्कृतिक अशा वेगवेगळया दृष्टीकोनातून वेध घेवून त्यातील वेगळेपण अधोरेखीत करते.

**संदर्भ -**

1.साखरे सीमा, स्त्रीवाद, सीमा प्रकाशन नागपूर

2.ज्योती रामोड, स्त्रीवाद इतिहास लेखक परंपरेचे चिकित्सक विश्लेषण

**3.**डॉ. अश्विनी तोरणे, स्त्रीवाद बहुआयामी चर्चाविश्व

4.जीताली वि.म. स्त्रीवाद सुपर वुमन – प्रतिमे मागील सत्तासंबंधाचे सांस्कृतिक राजकारण

5.स्त्रीवाद बहुआयामी चर्चाविश्व - संपादक, अश्विनी तोरणे, शीतल पावसकर, भोसले, लता पांचाळ, प्रतिभा टेंबे, माधुरी पाथरकर, आशा हुबे, पडळकर, नीतीन आरेकर, राजेश खरात - हरिती प्रकाशान पुणे

6.Education and Society शिक्षण आणि समाज Since 1977 year 46 Issue No 02 Jan Mar 2023

7.गुप्ता चारु (2016) पुरुषत्वाच्या प्रतिमा, सुरेश खोले, सूरज पवार, दयानंद कनकदेडे (अनु) हरिती प्रकाशन पुणे